


औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीतर्फे 'किले ए अर्क' परिसरात आयोजित हेरिटेज वॉकमध्ये सहभागी इतिहासप्रेमी.

दै. लोकमत ४ सप्टेंबर 2017

# 'किलेअर्क' हेरिटेज वॉकला शहरातील इतिहासप्रेमींची गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** शहरातील ऐतिहासिक असलेल्या 'किलेअर्क' परिसरात आयोजित हेरिटेज वॉकला इतिहासप्रेमींनी गर्दी केली होती. किले अर्कमधील सर्व वास्तूंची पाहणी केल्यानंतर इतिहासतज्ज्ञ डॉ. दुलारी कुरेशी यांच्यासह इतरांनी निर्मितीपासूनचा इतिहास सांगितला.


औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीतर्फे दर पंधरा दिवसांनी शहरातील वेगवेगळ्या ऐतिहासिक वास्तूंवर हेरिटेज वॉक आयोजित करण्यात येतो. आतापर्यंत पाणचक्की, बीबी का मकबरा, हिमायत बाग, औरंगाबाद लेणी, सोनेरी महाल याठिकाणी हे कार्यक्रम झाले. या रविवारी शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या पण सर्वांच्या दृष्टीने अपरिचित आणि दुर्लक्षित 'किलेअर्क' या ऐतिहासिक वास्तूची निवड करण्यात आली. यासाठी सकाळी ७ वाजता बहुसंख्येने इतिहासप्रेमी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय परिसरात जमा झाले होते. दख्खनचा प्रदेश काबीज करण्यासाठी आलेले औरंगजेब या ठिकाणी वास्तव्याला होते. चोहीबाजूंनी बंदिस्त तटबंदीत जागोजागी मर्दाना महाल, जनाना महाल, मोती मस्जिद, जनाना मस्जिद, कचेरी, रंगबारी, तहखाने, तोफा लावलेले बुरुज, सुभेदारी, नहरी, कारंजी, बागबगीचे याविषयीची माहिती इतिहासतज्ज्ञ डॉ. दुलारी कुरेशी यांनी केली. या छोट्या किल्ल्याच्या निर्मितीसंदर्भात अनेक मतमतांतरे आहेत. सरकारच्या गॅझेटमध्ये किलेअर्कची निर्मिती १६८२ साली झाल्याची नोंद आहे; मात्र रफत कुरेशी यांनी हा दावा खोडून काढत किले ए अर्कची निर्मिती १६५९ ची असल्याचे सांगितले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कुमुद गोरे-खेर्डेकर यांनीही मनोगत व्यक्त करीत सद्य:स्थितीची माहिती दिली. यावेळी केंद्रीय पुरातत्व विभागाचे उपअधीक्षक डॉ. शिवकांत बाजपेयी, नीलेश राऊत, ॲड. स्वप्नील जोशी, डॉ. बिना सेंगर, प्रदीप देशपांडे, नीलिमा मार्कंडेय, कुणाल खरात, किशोर निकम, डॉ. लक्ष्मण मस्के, डॉ. रमेश पेरकर, डॉ. उमेश मणियार, प्रा. सुचिता भारंबे, अमित देशपांडे, सौरभ जामकार, अजय ठाकूर, भारती ठाकूर, सुधीर कोर्टीकर, राजेंद्र जोशी, डॉ. कामाजी डक, संजय चिट्टमवार, धीरज देशमुख आदी उपस्थित होते.

**'एनएसएस' करणार स्वच्छता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक पुढील हेरिटेज वॉकपासून ऐतिहासिक स्थळांवर स्वच्छता मोहीम राबविणार असल्याची माहिती विद्यापीठाचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी यावेळी दिली, तर शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी रविवारच्या हेरिटेज वॉकमध्ये सहभाग नोंदवला.

Scanned with CamScanner


औरंगाबाद : पामेर कोठीजवळ स्वच्छता करताना स्वयंसेवक. (तिसऱ्या छायाचित्रात) मर्दाना महालबाहेर रविवारी जमलेले रासेयो स्वयंसेवक.

सकाळ ११ सप्टेंबर २०१६

# किलेअर्कच्या स्वच्छतेसाठी सरसावले 'एनएसएस'

## शासकीय महाविद्यालयात स्वच्छता मोहिमेत ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. १० : ऐतिहासिक किलेअर्कच्या विविध इमारतींभोवतीची अस्वच्छता दूर करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेने रविवारी (ता. १०) पुढाकार घेतला. शहरातील १५ महाविद्यालयांतील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी श्रमदान करून येथील वास्तू स्वच्छ केल्या.

औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीने गेल्या रविवारी (ता. तीन) किलेअर्क भागात आयोजित केलेल्या हेरिटेज वॉकमध्ये विद्यापीठाचे रासेयो समन्वयक डॉ. टी. आर. पाटील यांनी या ठिकाणी स्वच्छता कॅम्प लावण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आज पुरातत्त्व विभागातील नीलिमा मार्कंडेय आणि इतर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आदिल कोठी, पामेर कोठी, मर्दाना महल आणि परिसरात उगवलेले गवत, झुडपे काढण्यात आली. प्राचार्या डॉ. कुमुद गोरे-खेर्डेकर यांच्या उपस्थितीत शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयाचे प्रवेशद्वार असलेल्या आदिल दरवाजाच्या स्वच्छतेपासून या मोहिमेला सुरवात झाली. दरवाजाच्या भोवती असलेले गवत आणि दरवाजावर जाण्यासाठीच्या दगडी जिन्यात जमा झालेली दगडमाती काढून रस्ता मोकळा करण्यात आला.

या मोहिमेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रासेयो युनिट डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सामील झाले होते. शासकीय महाविद्यालयाने या कॅम्पच्या आयोजनाची जबाबदारी स्वीकारली. त्याशिवाय विवेकानंद महाविद्यालय, मौलाना आझाद महाविद्यालय, देवगिरी महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, कला महाविद्यालय, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, राजर्षी शाहू महाविद्यालय, एमआयटी महाविद्यालय, सर सय्यद कॉलेज आणि बिडकीनच्या लोकसेवा महाविद्यालयाच्या तीनशेहून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

कॅम्पच्या यशस्वितेसाठी विद्यापीठ युनिटचे डॉ. विलास इप्पर, डॉ. सोनाली क्षीरसागर, डॉ. आनंद माने, डॉ. दिगंबर गायकवाड, डॉ. अर्चना चापोलीकर, डॉ. लक्ष्मण म्हस्के, एनएसएसचे प्रा. रमेश पेरकर, प्रा. तृप्ती सपकाळे, डॉ. भाऊसाहेब देवमुंढे, डॉ. दिग्विजय टेंगसे, प्रा. आर. एच. मोगल, डॉ. फैयाझ शेख, डॉ. शीतल बारहाते, डॉ. सय्यद मुजीब मुसा, प्रा. वैशाली पेरके, प्रा. नितीन आहेर, अभय जाधव, डॉ. सय्यद हुसेन, रासेयोचे जिल्हा समन्वयक शेख परवेज, डॉ. प्रकाश वाणी, डॉ. जे. डी. शेख, डॉ. आर. एन. वाघ, मोहन सौंदर्रे यांनी परिश्रम घेतले. हेरिटेज वॉक उपक्रमातील सुधीर कोर्टीकर, श्री. लतीफ, ॲड. धनंजय साखरे हेही सहभागी झाले.

स्वच्छता मोहीम यशस्वी झाल्यानंतर मर्दाना महाल ते सुभेदारी विश्रामगृहापर्यंत स्वच्छता जनजागृती फेरी काढण्यात आली. शासकीय महाविद्यालयातर्फे सर्व स्वयंसेवकांच्या चहापान व अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र टाईम्स ११ सप्टेंबर २०१७.

# ऐतिहासिक वास्तू जपण्याची धडपड

## ३९० विद्यार्थ्यांकडून किलेअर्क परिसराची साफसफाई

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

पर्यटन राजधानी असलेल्या औरंगाबादमधील पुरातन वास्तु, त्यांच्या साफसफाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. शहरातील अशा ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धन, जतनासाठी कॉलेजांमधील तरुणाईची धडपड सुरू आहे. रविवारी एक एक तरुण जमत गेला आणि शेकडो हातांनी किलेअर्क, विश्रामगृहाच्या इमारत परिसरातील वास्तूंची साफसफाई करत स्वच्छतेचा आदर्श घालून दिला. पारंपारिक अभ्यासक्रमांसह, इंजिनीअरिंग, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी देश-विदेशातील लाखो पर्यटक येतात. अनेक प्रेक्षणीय पर्यटनस्थळाच्या परिसरातील अस्वच्छता दिसते. पर्यटनस्थळाच्या परिसरात बाटल्या, पिशव्या, दारुच्या बाटल्या पडलेल्या आढळतात. पर्यटस्थळांची नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधीही पसरते. ऐतिहासिक वास्तूंच्या स्वच्छतेची जबाबदारी तरुणाईने आपल्या खांद्यावर घेतली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयोचे हे स्वयंसेवक आहेत. विविध कॉलेजच्या हे विद्यार्थी प्रत्येक रविवारी एका ऐतिहासिक वास्तू परिसरातील साफसफाई करत वास्तू जतन करण्याचे संदेश देतात. या रविवारी ही तरुणाई सुभेदारी विश्रामगृहाच्या परिसरात एकवटली. सकाळी ६ ते १० वेळेत शासकीय ज्ञान विज्ञान कॉलेजच्या पसिरातील मर्दाना महल, आदिल दरवाजा, शाही मजीद या ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरातील साफसफाई केली. विविध कॉलेज, अभ्यासक्रमाचे ३९० विद्यार्थी यात सहभागी झाले होते.



ऐतिहासिक वास्तूच्या स्वच्छतेसाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी किलेअर्क परिसरातील साफसफाई केली.



### अधिकाऱ्यांनीही घेतला सहभाग

तरुणाईच्यासोबत अधिकारी वर्गही स्वच्छतेच्या या मोहिमेत सहभागी झाला. विद्यापीठातंर्गत २८ रासेयोचे कार्यक्रम अधिकारी ऐतिहासिक वास्तूंच्या पसिरातील साफसफाईच्या कामात उतरले. प्लास्टिक, केरकचरा, वाढलेले गवत आणि इतर केरकचरा विद्यार्थ्यांनी साफ करत परिसर स्वच्छ करत या पुरतान वास्तूला गतवैभव प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. यावेळी शासकीय ज्ञान विज्ञानच्या प्राचार्य कुमुद खेर्डेकर, रासेयोचे संचालक डॉ. टी. आर. पाटील, डॉ. विलास इप्पर, डॉ. सोनाली क्षीरसागर, डॉ. आनंद माने, डॉ. दिगंबर गायकवाड, डॉ. अर्चना चापोलीकर, डॉ. लक्ष्मण म्हस्के, प्रा. तृप्ती सपकाळे, प्रा. रमेश पटेकर, डॉ. भाऊसाहेब देवमुंढे, प्रा. आर. एच. मोगल, डॉ. पय्याज शेख आदींची उपस्थिती होती.



ऐतिहासिक स्थळांच्या स्वच्छता मोहिमेची सुरुवात आज किल्लेअर्क परिसरपासून करण्यात आली विद्यार्थी वर्गासोबतच सर्व भारतीयांनी हा अनमोल ठेवा जपणे गरजेचे आहे. या मोहिमेची मी एक भाग आहे याचा आनंद आहे.

- रेणुका सोळंके



सरकारचे ऐतिहासिक वास्तूंच्या बाबतीत असलेलं उदासीन धोरण बघता या स्थळांची स्वच्छता करण्याचा निर्णय रासेयो तर्फे घेण्यात आला. औरंगाबाद जिल्ह्याची पर्यटन राजधानी म्हणून ओळख असून या ऐतिहासिक स्थळांच्या स्वच्छता ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

- अजय पवार



आज अनेक महाविद्यालयीन रासेयो स्वयंसेवकांनी एकत्र येऊन ऐतिहासिक वास्तू स्वच्छता मोहीम सुरू केली. निश्चितच ही बाब कौतुकास्पद व समाजाला आदर्श दाखवणारी आहे. या मोहिमेत अधिकाधिक लोकांनी सहभागी होऊन या कामात गती आणण्याची गरज आहे

- सुवर्णा चव्हाण



आज शासकीय महाविद्यालय, सुभेदारी विश्रामगृह या परिसरातून स्वचतेच्या अभिनव उपक्रमास सुरुवात झाली. या मोहिमेची व्याप्ती वाढवून जनजागृती करण्याचा आमचा मानस आहे.

- प्रसाद देशमुख

Scanned with CamScanner

घेण्यात येणारा दुसरा गंधर्व संगीत महोत्सव सोमवारी (ता. चार) होणार आहे. यंदाही या महोत्सवात गायन क्षेत्रातील दिग्गजांना आमंत्रित करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या सभागृहात सायंकाळी चारला या महोत्सवास सुरवात होईल. यंदा महोत्सवात कल्याण अपार यांचे शहनाई वादन आणि पंडित रामदास पळसूल यांच्या एकल तबलावादनाचा कार्यक्रम होणार आहे. डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांचे शास्त्रीय गायन होईल. या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्या डॉ. रोहिणी पांढरे-कुलकर्णी, संगीत विभागप्रमुख डॉ. वैशाली देशमुख यांनी केले आहे.

दिव्य मराठी 13/12/2017

# 'ज्ञान- विज्ञान'मध्ये एनसीसी दिन साजरा



**डीबी स्टार** | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात ५१ महाराष्ट्र बटालियन व ७ गर्ल्स बटालियन युनीटच्या वतीने राष्ट्रीय छात्रसेना दिवस साजरा करण्यात आला.

यानिमित्त महाविद्यालयात दत्ताजी भाले रक्तपेढी च्या सहकार्याने जिल्हास्तरीय रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात देवगिरी महाविद्यालय, मौलाना आझाद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्या डॉ. रोहिणी पांढरे-कुलकर्णी, लेफ्टनंट रमेश पेरकर, रक्तपेढीचे कृष्णा कुलकर्णी, सीटीओ तृप्ती सपकाळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होत.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी 13/12/2017

# 'ज्ञान- विज्ञान'मध्ये एनसीसी दिन साजरा



**डीबी स्टार** | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात ५१ महाराष्ट्र बटालियन व ७ गर्ल्स बटालियन युनीटच्या वतीने राष्ट्रीय छात्रसेना दिवस साजरा करण्यात आला.

यानिमित्त महाविद्यालयात दत्ताजी भाले रक्तपेढी च्या सहकार्याने जिल्हास्तरीय रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात देवगिरी महाविद्यालय, मौलाना आझाद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्या डॉ. रोहिणी पांढरे-कुलकर्णी, लेफ्टनंट रमेश पेरकर, रक्तपेढीचे कृष्णा कुलकर्णी, सीटीओ तृप्ती सपकाळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होत.

Scanned with CamScanner

दि. 14/3/18

सन्मान | शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांत महिला दिन उत्साहात साजरा

# महिला दिनानिमित्त सत्कार, आरोग्य तपासणी अन् स्वयंरोजगार मार्गदर्शन

औरंगाबाद | जागतिक महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये व सामाजिक संघटनांतर्फे विविध उपक्रम राबवण्यात आले. ठिकठिकाणी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. भगवान बालिकाश्रमात मिठाई वाटप, घरेलू कामगार महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर तसेच स्वयंरोजगार मार्गदर्शन करण्यात आले.



## दामिनी पथकाचा सत्कार


औरंगाबाद । शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त दामिनी पथक तसेच दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी झालेली विद्यार्थिनी शेख अलमास अंजुम हिचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात शिक्षकेतर कर्मचारी कुसुम क्षीरसागर, सफाई कर्मचारी देवी राणा यांना उत्कृष्ट सेवेबद्दल सन्मानपत्र देण्यात आले. दामिनी पथकाच्या कॉन्स्टेबल लता जाधव, कोमल निकाळजे, पूनम झाल्टे, संगीता रिठे यांनाही सन्मानित करण्यात आले.

Scanned with CamScanner

उपस्थित होता. या ज्ञान उत्सवाच्या यशस्वीतेसाठी शैलेश चाबुस्कवार, हर्षवर्धन म्हस्के, अक्षय शिंदे, सोनाली साळवे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयात जयंती

शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठातील लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. सतीश दांडगे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सतीश दांडगे, प्राचार्य डॉ. रोहिणी कुलकर्णी-पांढरे, डॉ.पी.एस. देशमुख, डॉ. रजेश पेरकर, संतोष मोरे आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यानंतर डॉ. दांडगे यांनी 'डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक परिवर्तनविषयक विचार आणि सद्य:स्थिती' या विषयावर मार्गदर्शन केले. देशाला विविध क्षेत्रात पुढे घेऊन जाण्यासाठी बाबसाहेबांच्या विचारांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्राचार्या डॉ. रोहिणी कुलकर्णी- पांढरे यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन शेख असिफ शेफ रफिक यांनी केले. आभार राहुल राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. लक्ष्मण म्हस्के, प्रा. अंकशु गायकवाड, प्रा. सुचिता भारंबे आदींनी परिश्रम घेतले.




शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. सतीश दांडगे. यावेळी मंचावर प्राचार्या डॉ. रोहिणी कुलकर्णी-पांढरे, डॉ. पी. एस. देशमुख आदी.

दैनिक लोकमत - 16 एप्रिल 2018

Scanned with CamScanner

सकाळ २७ सप्टेंबर २०१८

अवतीभवती



ंगाबाद : मध्यवर्ती बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेत एनसीसी डटने सहभाग घेतला.

# बसस्थानकात स्वच्छता मोहीम

औरंगाबाद : देशव्यापी स्वच्छता अभियानाचा भाग म्हणून रविवारी ता. २४) मध्यवर्ती बसस्थानकात स्वच्छता मोहीम राबविली. यात नसीसीच्या महाराष्ट्र बटालियनने सहभाग घेतला. यात एनसीसीच्या ब्बल दोनशे कॅडेटनी संपूर्ण बसस्थानक चकाचक केले. कॅप्टन परशुराम ाचेवाड, ले. श्री. परेकर, शेख सलीम, प्रकाश नागरे, असद खान, आर. डी. मुंढे, श्री. गाडेकर, श्री. बढे, श्री. राठोड यांच्यासह आगारप्रमुख अमोल भुसारी, वाहतूक निरीक्षक ललित शहा, मिलिंद पानपाटील, तसेच दीपक बागलाने, घनश्याम म्हस्के, सलीम शेख यांची उपस्थिती होती.

Scanned with CamScanner

१४ ऑगस्ट - २०१९ - दिव्यमराठी

# ज्ञान विज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपण

औरंगाबाद • डीबी स्टार



शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय आणि रोटरी क्लब मेट्रो यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात शंभर झाडांची रोपटी लावून पर्यावरण समतोल राखण्याचा प्रयत्न केला.

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात रोटरी मेट्रोचे प्रकल्प अधिकारी डॉ. मिलिंद देशपांडे यांनी युवकांच्या नेतृत्वगुणांच्या विकासासाठी असलेले रोटरी प्रकल्पाची माहिती दिली. या वेळी रोटरी क्बलचे वरिष्ठ सदस्य चंद्रकांत चौधरी यांनी पुढील वर्षी जून महिन्यांत वृक्षसंवर्धन करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक झाड दत्तक घ्यावे. जेवढी झाडे संवर्धित होतील तेवढे पुरस्कार रोटरी क्लबच्या मुख्य कार्यक्रमात विद्यार्थ्यांना जाहीर करू, असेही त्यांनी सांगितले. या वेळी कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रोहिणी कुलकर्णी-पांढरे, रोटरी क्बलचे पोलकम, श्रीमती देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीसाठी मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रम राबवण्यासाठी सायन्स फोरमच्या डॉ. स्मिता धर्माधिकारी, एनसीसीचे समन्वयक भरत उसारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकांचा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. या वेळी महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. कार्यक्रमात डॉ. सीमा बोडखे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी 2/03/2020

# वनस्पती, भाज्या, फळांचे भरवले प्रदर्शन



**डीबी स्टार**| शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने आगळा-वेगळा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी वनस्पतींपासून मिळणाऱ्या जीवनोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले.

वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने भरवण्यात आलेल्या प्रदर्शनात कडधान्य, तेल बियाणे, औषधी उपयोगी वनस्पती, भाज्या, फळे व फुले बघायला मिळाली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एस. सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. धर्माधिकारी, डॉ. सराफ, डॉ. राजेशेख, डॉ. मोरये, डॉ. चापोलीकर, भारंभे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी भित्तिपत्रकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष वनस्पती व त्याचे बियाणे दाखवून वनस्पतींच्या कुळाबद्दल व उपयोगाबद्दल माहिती दिली. प्रदर्शनाला परीक्षक म्हणून डॉ. जे. एस. अंभोरे, डॉ. रूपाली बिरादार यांनी केले. वनस्पतिशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. गंभीरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सीमा बोडके यांनी मांडणी केली. या प्रदर्शनासाठी डॉ. सुलोचना राठोड, डॉ. नजीर शेख, डॉ. योगेश मालचे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

लोकमत

२० ऑक्टोबर २०२१



# शासकीय महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**औरंगाबाद :** शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी युनिकेअर हेल्थ सेंटर मुंबई यांच्यामार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र सातपुते यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन पार पडले. यावेळी डॉ. सुरेंद्र ठाकूर, डॉ. व्ही. आर मोरे, डॉ. बळीराम लहाने, डॉ. भगवान कांबळे, राजेंद्र जाधव, कार्यालयीन अधीक्षक प्रल्हाद अडागळे, डॉ. सुचिता भारंबे आदींनी युनिकेअरच्या टीमचे स्वागत केले.

Scanned with CamScanner




औरंगाबाद : स्वामी समर्थ अनाथ आश्रमाला खुर्च्या भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांसोबत आश्रमातील व शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे शिक्षक.

# अनाथाश्रमाला २५ खुर्च्या भेट

**औरंगाबाद :** स्वामी समर्थ अनाथाश्रमातील गोरगरीब विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी २५ खुर्च्या शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालयातर्फे १ जानेवारीला भेट देण्यात आल्या. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांतर्फे नविन वर्षानिमित्त सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम राबविला. प्राचार्य डॉ. आर. एच. सातपुते, अध्यापक डॉ. बळीराम लहाने, डॉ. विठ्ठल मोरे यांची उपस्थिती होती. आश्रमातर्फे अधीक्षक धोंडीराम कांकडे यांनी खुर्च्यांचा स्वीकार केला. चिकाटी, जिद्द अंगी बाळगून अभ्यास करावा. तसेच आश्रमातील विद्यार्थ्यांना सामाजिक भान ठेवून गरजूंना मदतीचे आवाहन डॉ. लहाने यांनी केले.

Scanned with CamScanner

# दिंडी सोहळा पायीवारीतील भावीकांचे प्रबोधन



**निघोज / प्रतिनिधी**

युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते पंढरपूर स्वच्छ वारी – स्वस्थ वारी – निर्मल वारी – हरित वारी – लोकशाही वारी या दिंडीचे आयोजन दिनांक २२ जून ते १० जुलै, २०२२ या दरम्यान करण्यात आले असून या प्रबोधन कार्यक्रम तसेच समाजसेवी उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याची माहिती खासदार डॉ सुजयदादा विखे पाटील युवा मंचचे पारनेर तालुका प्रवक्ते प्रतिक वरखडे यांनी दिली आहे. या दिंडीच्या माध्यमातून वारीमार्गावरील गावांचे सामाजिक आणि आर्थिक सव्र्वेक्षण, स्वच्छता मोहीम, लोकशाही व मतदान जनजागृती अभियान, पथ नाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, पायी चालणारे वारकरी यांची हात आणि पायाची मालिश, पोलीस मित्र म्हणून मदत अशा विविध विषयांवर काम केले आहे. याबरोबरच लोणंद मुक्कामी वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंड्याचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव येथील पालखी तळाची सच्छता या दिंडीतील विद्यार्थ्यांनी केले. या दिंडीत महाराष्ट्रातील विद्यापीठातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या दिंडीचे हे वे१८ वर्ष असून या माध्यमातून आजवर विविध विषयांवर प्रबोधन आणि सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थी स्वयं सेवकांनी केले आहे. या दिंडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्राचार्य कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुल सचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, रासेयो संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या दिंडीसोबत पारनेर तालुक्यातील आळकुटी येथील पद्मश्री विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ.शरद पारखे, डॉ. विलास कर्डिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी, शलिनी पेखले, वैशाली घुले हे प्राध्यापक कार्यक्रम अधिकारी म्हणून सहभागी झाले आहेत.

# विद्यार्थ्यांचा वारकऱ्यांशी संवाद

## ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी



**निघोज, दि. ५ (वार्ताहर)** - दिंडीतील भाविकांचे प्रबोधन, तसेच समाजसेवी उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याची माहिती पारनेर तालुका प्रवक्ते प्रतीक वरखडे यांनी दिली.

या दिंडीच्या माध्यमातून वारीमार्गावरील गावांचे सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण, स्वच्छता मोहीम, लोकशाही व मतदान जनजागृती अभियान, पथनाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, वारकरी यांची हात आणि पायाची मालिश, पोलीस मित्र म्हणून मदत अशा विविध विषयांवर काम केले आहे. याबरोबरच लोणंद मुक्कामी वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंड्यांचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव येथील पालखी तळाची स्वच्छता या दिंडीतील विद्यार्थ्यांनी केली. या दिंडीत राज्यातील ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या दिंडीचे हे १८वे वर्ष असून, या माध्यमातून आजवर विविध विषयांवर प्रबोधन आणि सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थी स्वयंसेवकांनी केले आहे.

या दिंडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्रकुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, रासेयो संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या दिंडीसोबत अळकुटी येथील पद्मश्री विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. शरद पारखे, डॉ. विलास कर्डिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी आदी सहभागी झाले आहेत.



तरडगाव : पालखी तळाची स्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.

# पुणे ते पंढरपूर स्वच्छता वारी

**फलटण शहर ता. ३ :** युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार, रासेयो उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते पंढरपूर स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी-लोकशाही वारी या दिंडीचे आयोजन २२ जून ते १० जुलै २०२२ यादरम्यान करण्यात आले आहे.

लोणंद मुक्कामी वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंड्यांचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. या दिंडीत महाराष्ट्रातील ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या दिंडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, रासेयो संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या दिंडीसोबत डॉ. विलास कर्डिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी, शलिनी पेखले, वैशाली घुले हे प्राध्यापक कार्यक्रम अधिकारी म्हणून सहभागी झाले आहेत.

# वारीत 'रासेयो'च्या तरुणांचा आगळा जागर

## स्वच्छता, शिस्तीसोबत वारकऱ्यांचे प्रबोधन

सकाळ वृत्तसेवा

माळशिरस, ता. ८ : पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी वारीत स्वच्छता, सेवा व मतदान अधिकाराचा जागर या सारख्या अनेक उपक्रमांनी मोठे योगदान दिले आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापिठाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक वेगळा उपक्रम दिला आहे. विद्यापिठाच्या अंतर्गत महाविद्यालये व राज्यातील इतर महाविद्यालयांना ही संधी दिली आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रा. प्रभाकर देसाई, डॉ. विलास करडिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर प्पुरा, डॉ. वैशाली थूल, प्रा. शालिनी टेकळे आदींच्या मार्गदर्शनाखाली वारीचे नियोजन केले गेले.

त्यानुसार या वारीत एकूण १५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. पालखीची स्वच्छता करणे, दिंडी पुढे गेल्यानंतर मागील मुक्कामावर स्वच्छता करणे, पोलिसांना वाहतुकीसाठी मदत करणे, रिंगण व इतर कार्यक्रमासाठी वारकऱ्यांना शिस्त लावण्याचे काम करणे या सारखी सर्व कामे ही टिम करत असते. रात्रंदिवस ही टीम सक्रीय असते. त्यासोबत मतदारांना मतदानाच्या अधिकाराचे महत्व समजावे यासाठी हे विद्यार्थी पथनाट्य सादर करतात. दिंडी प्रोहोचेपर्यंत हा लोकशाही जागराचा कार्यक्रम प्रभावीपणे विद्यार्थी सादर करतात. अत्यंत उत्साहात समाजप्रबोधनाचा संदेश हे विद्यार्थी वारकऱ्यांना देतात.

> “ मी नाशिकला शिक्षण घेतो. अचानक एक दिवस मला माझ्या सरांनी वारीत जायचे आहे, असे सांगितले. लगेच मी तयार झालो. मागील १२ दिवसांपासून वारीत सर्व स्वयंसेवकासोबत सामील झालो. या कामामुळे माझ्या करिअरला नवी प्रेरणा मिळाली. अनेक अधिकारी व मान्यवरांनी आमच्या कामाबद्दल पाठीवर शाबासकीची थाप दिली, याचा खूप आनंद वाटतो.
>
> – समाधान बोरसे, अशोक स्तंभ, नाशिक.

स्वच्छतेच्या कामाचे सर्व मियोजन केले जाते. पालखी मुक्कामी येण्यापूर्वी विद्यार्थी गावातील सर्व कचरा गोळा करुन स्वच्छतेचे काम पूर्ण करतात. पुन्हा वारीत सामील होतात. मागील १२ दिवसांपासून सर्व प्राध्यपक व विद्यार्थी यांनी या कामामुळे पालखी सोहळ्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. तरुण पिढीला वारीच्या परंपरेत मिळालेली सेवा हा आयुष्यभराचा ठेवा वाटतो.

### काय करतात रासेयोचे तरुण

- पालखीची स्वच्छता
- मुक्कामाच्या परिसराची नंतरची स्वच्छता
- पोलिसांना मदत
- पालखीच्या कार्यक्रमात शिस्तीसाठी मदत
- स्वयंसेवी कार्ये
- मतदानाच्या अधिकाराबाबतचे पथनाट्य

4:44 Jio 4G



# विद्यार्थ्यांचा वारकऱ्यांशी संवाद

## ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी



निघोज, दि. ५ (वार्ताहर) - दिंडीतील भाविकांचे प्रबोधन, तसेच समाजसेवी उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याची माहिती पारनेर तालुका प्रवक्ते प्रतीक वरखडे यांनी दिली.

या दिंडीच्या माध्यमातून वारीमार्गावरील गावांचे सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण, स्वच्छता मोहीम, लोकशाही व मतदान जनजागृती अभियान, पथनाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, वारकरी यांची हात आणि पायाची मालिश, पोलीस मित्र म्हणून मदत अशा विविध विषयांवर काम केले आहे. याबरोबरच लोणंद मुक्कामी वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंड्यांचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव येथील पालखी तळाची स्वच्छता या दिंडीतील विद्यार्थ्यांनी केली. या दिंडीत राज्यातील ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या दिंडीचे हे १८वे वर्ष असून, या माध्यमातून आजवर विविध विषयांवर प्रबोधन आणि सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थी स्वयंसेवकांनी केले आहे.

या दिंडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्रकुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, रासेयो संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या दिंडीसोबत अळकुटी येथील पद्मश्री विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. शरद पारखे, डॉ. विलास कर्डिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी आदी सहभागी झाले आहेत.

पारनेर दर्शन

# स्वच्छ, स्वस्थ, निर्मल, हरित आणि लोकशाही वारी!

## पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून पंढरीच्या दिंडयांमध्ये प्रबोधन

**निघोज : प्रतिनिधी**

**पंढरपूरच्या वारीला निघालेल्या वारकऱ्यांमध्ये स्वच्छता, लोकशाही व मतदान जागृती, लेक वाचवा अभियान आदींबरोबरच वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे ते पंढरपूर दरम्यानच्या स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरित वारी, लोकशाही वारी या दिंडीतील स्वयंसेवकांकडून करण्यात येत आहे.**

भारत सरकारचे युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना, राज्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या दिंडीचे आयोजन २२ जून ते १० जुलै दरम्यान करण्यात आले आहे. या दिंडीमार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या प्रबोधन तसेच समाजसेवी उपक्रमांना वारकरी तसेच दिंडीमार्गातील नागरिकांकडून मोठा प्रतिसाद लाभत असल्याचे डॉ. सुजय विखे युवा मंचचे पारनेर तालुका प्रवक्ते प्रतिक वरखडे यांनी सांगितले.



दिंडीच्या माध्यमातून वारीमार्गावरील गावांचे सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण, स्वच्छता मोहिम, लोकशाही व मतदान जनजागृती अभियान, पथनाटयांच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, पायी चालणारे वारकरी यांच्या हाताची तसेच पायाची मालीश, पोलिस मित्र म्हणून मदत आदी उपक्रम या दिंडीतील स्वयंसेवक दररोज राबवित आहेत.

दिंडी लोणंद मुक्कामी असताना वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंडयांचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर स्वयंसेवकांनी वारीतील वारकऱ्यांशी संवाद साधला. सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगांव येथील पालखी तळांची स्वच्छता करण्यात आली.

या दिंडीमध्ये महाराष्ट्राच्या ८ विद्यापीठांमधील १७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. दिंडीचे हे १८ वे वर्ष असून आजवर विविध विषयांवर प्रबोधन आणि सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थ्यांनी केलेले आहे. या दिंडीसाठी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. दिंडीसोबत पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील पद्श्री विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. शरद पारखे, डॉ. विलास कर्डीले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी, शालिनी पेखले, वैशाली घुले हे प्राध्यापक कार्यक्रम अधिकारी म्हणून सहभागी झाले आहेत.

# विद्यार्थ्यांचा वारकऱ्यांशी संवाद

## ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी



निघोज, दि. ५ (वार्ताहर) - दिंडीतील भाविकांचे प्रबोधन, तसेच समाजसेवी उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याची माहिती पारनेर तालुका प्रवक्ते प्रतीक वरखडे यांनी दिली.

या दिंडीच्या माध्यमातून वारीमार्गावरील गावांचे सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण, स्वच्छता मोहीम, लोकशाही व मतदान जनजागृती अभियान, पथनाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, वारकरी यांची हात आणि पायाची मालिश, पोलीस मित्र म्हणून मदत अशा विविध विषयांवर काम केले आहे. याबरोबरच लोणंद मुक्कामी वारीतील अर्थकारण, उद्योजकता, दिंड्यांचा इतिहास, वारीतील व्यवस्थापन, महिला सबलीकरण या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव येथील पालखी तळाची स्वच्छता या दिंडीतील विद्यार्थ्यांनी केली. या दिंडीत राज्यातील ८ विद्यापीठांतील १७० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या दिंडीचे हे १८वे वर्ष असून, या माध्यमातून आजवर विविध विषयांवर प्रबोधन आणि सर्वेक्षण करण्याचे काम विद्यार्थी स्वयंसेवकांनी केले आहे.

या दिंडीसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्रकुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, रासेयो संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या दिंडीसोबत अळकुटी येथील पद्मश्री विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. शरद पारखे, डॉ. विलास कर्डिले, डॉ. राजकुमार रिकामे, डॉ. परमेश्वर पुरी आदी सहभागी झाले आहेत.

लोकमत



# शासकीय महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**औरंगाबाद :** शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी युनिकेअर हेल्थ सेंटर मुंबई यांच्यामार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र सातपुते यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन पार पडले. यावेळी डॉ. सुरेंद्र ठाकूर, डॉ. व्ही. आर मोरे, डॉ. बळीराम लहाने, डॉ. भगवान कांबळे, राजेंद्र जाधव, कार्यालयीन अधीक्षक प्रल्हाद अडागळे, डॉ. सुचिता भारंबे आदींनी युनिकेअरच्या टीमचे स्वागत केले.

Hello Aurangabad
Page No. 3 Feb 20, 2021
Powered by: erelego.com

दिव्य मराठी

# शासकीय महाविद्यालयात आरोग्य शिबिर

औरंगाबाद | युनिकेअर हेल्थ सेंटर मुंबई यांच्या वतीने शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यात ५९ जणांची तपासणी करण्यात आली. प्राचार्य डॉ. राजेंद्र सातपुते यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी युनिकेअर हेल्थ सेंटरचे राजेश आधव यांची उपस्थिती होती. डॉ. सातपुते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी सहसंचालक डॉ. व्ही.आर. मोरे, डॉ. बळीराम लहाने, डॉ. भगवान कांबळे, अधीक्षक प्रल्हाद अडागळे, डॉ. सुचिता भारंबे उपस्थित होते. डॉ. सुरेंद्र ठाकूर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. दीपक उसगुंडे यांनी छायाचित्रण केले.

22 फेब्रुवारी 2021





औरंगाबाद में रविवार को रक्षाबंधन के अवसर पर सेवन हिल परिसर में राखी बांधती हुई एक बालिका. दूसरे चित्र में किलेअर्क स्थित शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग की छात्राएं विभिन्न स्थानों पर कार्यरत लोगों को राखी बांधकर उन्हें अपनेपन का एहसास कराती हुई.

# रक्षा सूत्र बांधकर लिया रक्षा का वचन

**शहर में उत्साह के साथ मना रक्षाबंधन, प्रकृति के साथ बांधा रिश्ता**

औरंगाबाद | 26 अगस्त | लोक सेवा

अपने लाड़ले भाई को राखी बांधकर बहन ने उससे अपनी सुरक्षा का वचन लिया. इस भाई-बहन के स्नेह का प्रतीक रक्षाबंधन का त्यौहार आज शहर में पारंपरिक तरीके से और उत्साहपूर्ण वातावरण में मनाया गया.

रक्षाबंधन त्यौहार की तैयारियां बीते एक सप्ताह से जारी थीं. बहनें अपने मायके और भाई के घर पहुंची और शुभ मुहूर्त पर रक्षा सूत्र बांधे. त्यौहार मनाने के लिए आज तड़के से ही शहर में गतिविधियां नजर आ रही थीं. प्रत्येक घर के सामने आंगन में रंगोली उकेरने से पवित्र वातावरण का एहसास हो रहा था. कुछ नागरिकों ने सुबह, दोपहर और शाम में अपनी अपनी सुविधा के अनुसार रक्षाबंधन मनाया. त्यौहार के उपलक्ष्य में शहर के बाहर रहने वाली बहनें अपने मायके आ गई थीं, जबकि शहर की बहुएं अपने मायके गईं. दुकान में रखी हजारों राखियों से मनपसंद राखी चुनकर बहनों ने अपने भाइयों के घर गई थीं. वह अपने भाई की आरती उतार कर उसकी कलाई में रक्षासूत्र बांध रही थीं. भाई भी अपनी बहनों के लिए खास भेंट वस्तुएं लेकर आए थे. कुछ स्थानों पर नकद रकम और कुछ स्थानों पर पंजाबी ड्रेस, साड़ियां, गहने और अन्य भेंट वस्तुएं






दी गईं. तत्पश्चात संपूर्ण परिवार ने सहभोजन का आनंद उठाया. शहर में ऐसे कई एकत्रित परिवार हैं, जो राखी पूर्णिमा का समारोह सामूहिक रुप में मनाते हैं. पचास-साठ सदस्यों वाले परिवार की लड़कियां ससुराल से मायके आई थीं. परिवार के सदस्य दीपावली की भाई दूज के बाद एकजुट हुए थे. कुछ परिवारों ने रक्षा सूत्र के बंधन का समारोह घर में ही आयोजित किया, जबकि सहभोजन रेस्तरां में किया. रास्ते पर जाने-आने के दौरान छोटे और बड़ों के माथे पर लाल तिलक और हाथ पर राखी नजर आ रही थी. घर-घर में देर रात तक भोजन और गपशप का दौर जारी रहा

## राखी खरीदने के लिए भीड़

राखी पूर्णिमा की पूर्व संध्या पर रात बारह बजे तक शहर की दुकानें खुली रहीं. रविवार को त्यौहार के दिन सुबह सात बजे सामग्री, राखी विक्रेता और पुष्पमालाओं की दुकानें खुल गई थीं. आज महिलाओं की फिर एक बार राखी खरीदने के लिए दुकानों में भीड़ उमड़ पड़ी. हाथगाड़ी, स्टॉल और दुकानों से मनपसंद राखियों की खरीददारी की जा रही थी. राखियों के व्यवसाय में सवा करोड़ से अधिक का लेन-देन होने की बात व्यापारियों ने कही है.

### मंदिरों में राखियां चढ़ाई

महिलाओं ने परिसर के मंदिरों में जाकर सद्गुरुओं को राखियां अर्पित कीं. इडको के स्वामी समर्थ सेवा केंद्र में शाम की आरती के पश्चात सेवाकर्ता महिलाओं ने स्वामी समर्थ महाराज की प्रतिमा के सामने 'देव' राखियां अर्पित कीं. इस अवसर पर अनगिनत राखियां जमा हो गईं. सेवाकर्ता महिलाओं ने सेवाकर्ता पुरुषों को रक्षा सूत्र बांधकर यह त्यौहार मनाया. गारखेड़ा परिसर के गजानन महाराज मंदिर में महिलाओं ने महाराज की मूर्ति को देव राखियां अर्पित कीं. जिला परिषद के निकट बालकृष्ण महाराज मंदिर, औरंगपुरा का श्री दत्त मंदिर, एकनाथ महाराज मंदिर में भी महिलाओं ने राखियां अर्पित कीं. इस दौरान केसरिया, गुलाबी, पीली आदि विभिन्न रंगों की राखियों का ढेर मंदिरों में नजर आ रहा था.

### बदल गया भेंट का स्वरुप

पहले भाई बहन को नकद रुपए, साड़ियां अथवा कपड़े देता था. नए जमाने में अब मोबाइल, विभिन्न कंपनियों की टॉफियां, आर्टीफिशियल से लेकर सोने-चांदी के गहने, होटल में भोजन और सिनेमा दिखाने जैसी चीजें शामिल हो गई हैं.




औरंगाबाद में रविवार को युवा शक्ति मंच की ओर से हिमायत बाग में पेड़ों को राखी बांधने का कार्यक्रम आयोजित किया गया. दूसरे छायाचित्र में 'प्रयास' ग्रुप की ओर से पेड़ों को राखी बांधते युवा.

## राखी बांधकर दिया पेड़ों की रक्षा का संदेश

**औरंगाबाद.** रक्षाबंधन के अवसर पर विभिन्न सामाजिक संगठनों ने पेड़ों को राखी बांधकर पेड़ों की रक्षा का संदेश दिया. 'प्रयास' ग्रुप की ओर से शहर और परिसर के विभिन्न स्थानों पर स्थित पेड़ों को राखी बांधी गई. इस अवसर पर 'प्रयास' के रवि और अन्य सदस्य उपस्थित थे. इसके अलावा हिमायत बाग परिसर में युवा शक्ति मंच की ओर से पेड़ों को राखी बांधी गई. इस अवसर पर पूर्व महापौर सुदाम सोनवणे, पूर्व शहर अध्यक्ष इब्राहिम पठान, युवा शक्ति मंच के अध्यक्ष अब्दुल कय्यूम, शेख लतीफ, शेख अहमद, सैयद करीम, अनीस रामपुरे, संतोष मगर, गणेश पवार, संदीप कांबले, अनिल सालवे, कृष्णा बोरसे, राहुल सोनवणे आदि उपस्थित थे.

## शासकीय ज्ञान विज्ञान कॉलेज की छात्राओं ने बांधी राखी

**औरंगाबाद.** किलेअर्क स्थित शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग की छात्राओं ने निर्माण कार्य मजदूर, सुरक्षा रक्षक और चतुर्थ श्रेणी कर्मचारियों को राखी बांधकर रक्षाबंधन मनाया. इस अवसर पर प्राचार्य रोहिणी कुलकर्णी के साथ कार्यक्रम अधिकारी प्रज्ञाशीली सवाई, सुरेंद्र ठाकुर और वसंत उसारे तथा समिति के सदस्य अर्चना चापोलीकर, सुचेता भारंबे, अंकुश गायकवाड़ उपस्थित थे.







औरंगाबाद में रविवार को रक्षाबंधन के अवसर पर सेवन हिल परिसर में राखी बांधती हुई एक बालिका. दूसरे चित्र में किलेअर्क स्थित शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग की छात्राएं विभिन्न स्थानों पर कार्यरत लोगों को राखी बांधकर उन्हें अपनेपन का एहसास कराती हुई.

# रक्षा सूत्र बांधकर लिया रक्षा का वचन

**शहर में उत्साह के साथ मना रक्षाबंधन, प्रकृति के साथ बांधा रिश्ता**

औरंगाबाद | 26 अगस्त | लोस सेवा

अपने लाड़ले भाई को राखी बांधकर बहन ने उससे अपनी सुरक्षा का वचन लिया. इस भाई-बहन के स्नेह का प्रतीक रक्षाबंधन का त्यौहार आज शहर में पारंपरिक तरीके से और उत्साहपूर्ण वातावरण में मनाया गया.

रक्षाबंधन त्यौहार की तैयारियां बीते एक सप्ताह से जारी थीं. बहनें अपने मायके और भाई के घर पहुंचीं और शुभ मुहूर्त पर रक्षा सूत्र बांधे. त्यौहार मनाने के लिए आज तड़के से ही शहर में गतिविधियां नजर आ रही थीं. प्रत्येक घर के सामने आंगन में रंगोली उकेरने से पवित्र वातावरण का एहसास हो रहा था. कुछ नागरिकों ने सुबह, दोपहर और शाम में अपनी अपनी सुविधा के अनुसार रक्षाबंधन मनाया. त्यौहार के उपलक्ष्य में शहर के बाहर रहने वाली बहनें अपने मायके आ गई थीं, जबकि शहर की बहुएं अपने मायके गईं. दुकान में रखी हजारों राखियों से मनपसंद राखी चुनकर बहनों ने अपने भाइयों के घर गई थीं. वह अपने भाई की आरती उतार कर उसकी कलाई में रक्षासूत्र बांध रही थीं. भाई भी अपनी बहनों के लिए खास भेंट वस्तुएं लेकर आए थे. कुछ स्थानों पर नकद रकम और कुछ स्थानों पर पंजाबी ड्रेस, साड़ियां, गहने और अन्य भेंट वस्तुएं






दी गईं. तत्पश्चात संपूर्ण परिवार ने सहभोजन का आनंद उठाया. शहर में ऐसे कई एकत्रित परिवार हैं, जो राखी पूर्णिमा का समारोह सामूहिक रुप में मनाते हैं. पचास-साठ सदस्यों वाले परिवार की लड़कियां ससुराल से मायके आई थीं. परिवार के सदस्य दीपावली की भाई दूज के बाद एकजुट हुए थे. कुछ परिवारों ने रक्षा सूत्र के बंधन का समारोह घर में ही आयोजित किया, जबकि सहभोजन रेस्तरां में किया. रास्ते पर जाने-आने के दौरान छोटे और बड़ों के माथे पर लाल तिलक और हाथ पर राखी नजर आ रही थी. घर-घर में देर रात तक भोजन और गपशप का दौर जारी रहा

### राखी खरीदने के लिए भीड़

राखी पूर्णिमा की पूर्व संध्या पर रात बारह बजे तक शहर की दुकानें खुली रहीं. रविवार को त्यौहार के दिन सुबह सात बजे सामग्री, राखी विक्रेता और पुष्पमालाओं की दुकानें खुल गई थीं. आज महिलाओं की फिर एक बार राखी खरीदने के लिए दुकानों में भीड़ उमड़ पड़ी. हाथगाड़ी, स्टॉल और दुकानों से मनपसंद राखियों की खरीददारी की जा रही थी. राखियों के व्यवसाय में सवा करोड़ से अधिक का लेन-देन होने की बात व्यापारियों ने कही है.

### मंदिरों में राखियां चढ़ाई

महिलाओं ने परिसर के मंदिरों में जाकर सद्गुरुओं को राखियां अर्पित कीं. हडको के स्वामी समर्थ सेवा केंद्र में शाम की आरती के पश्चात सेवाकर्ता महिलाओं ने स्वामी समर्थ महाराज की प्रतिमा के सामने 'देव' राखियां अर्पित कीं. इस अवसर पर अनगिनत राखियां जमा हो गईं. सेवाकर्ता महिलाओं ने सेवाकर्ता पुरुषों को रक्षा सूत्र बांधकर यह त्यौहार मनाया. गारखेड़ा परिसर के गजानन महाराज मंदिर में महिलाओं ने महाराज की मूर्ति को देव राखियां अर्पित कीं. जिला परिषद के निकट बालकृष्ण महाराज मंदिर, औरंगपुरा का श्री दत्त मंदिर, एकनाथ महाराज मंदिर में भी महिलाओं ने राखियां अर्पित कीं. इस दौरान केसरिया, गुलाबी, पीली आदि विभिन्न रंगों की राखियों का ढेर मंदिरों में नजर आ रहा था.

### बदल गया भेंट का स्वरुप

पहले भाई बहन को नकद रुपए, साड़ियां अथवा कपड़े देता था. नए जमाने में अब मोबाइल, विभिन्न कंपनियों की टॉफियां, आर्टीफिशियल से लेकर सोने-चांदी के गहने, होटल में भोजन और सिनेमा दिखाने जैसी चीजें शामिल हो गई हैं.





औरंगाबाद में रविवार को युवा शक्ति मंच की ओर से हिमायत बाग में पेड़ों को राखी बांधने का कार्यक्रम आयोजित किया गया. दूसरे छायाचित्र में 'प्रयास' ग्रुप की ओर से पेड़ों को राखी बांधते युवा.

## राखी बांधकर दिया पेड़ों की रक्षा का संदेश

**औरंगाबाद.** रक्षाबंधन के अवसर पर विभिन्न सामाजिक संगठनों ने पेड़ों को राखी बांधकर पेड़ों की रक्षा का संदेश दिया. 'प्रयास' ग्रुप की ओर से शहर और परिसर के विभिन्न स्थानों पर स्थित पेड़ों को राखी बांधी गई. इस अवसर पर 'प्रयास' के रवि और अन्य सदस्य उपस्थित थे. इसके अलावा हिमायत बाग परिसर में युवा शक्ति मंच की ओर से पेड़ों को राखी बांधी गई. इस अवसर पर पूर्व महापौर सुदाम सोनवणे, पूर्व शहर अध्यक्ष इब्राहिम पठान, युवा शक्ति मंच के अध्यक्ष अब्दुल कय्यूम, शेख लतीफ, शेख अहमद, सैयद करीम, अनीस रामपुरे, संतोष मगर, गणेश पवार, संदीप कांबले, अनिल सालवे, कृष्णा बोरसे, राहुल सोनवणे आदि उपस्थित थे.

## शासकीय ज्ञान विज्ञान कॉलेज की छात्राओं ने बांधी राखी


**औरंगाबाद.** किलेअर्क स्थित शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग की छात्राओं ने निर्माण कार्य मजदूर, सुरक्षा रक्षक और चतुर्थ श्रेणी कर्मचारियों को राखी बांधकर रक्षाबंधन मनाया. इस अवसर पर प्राचार्य रोहिणी कुलकर्णी के साथ कार्यक्रम अधिकारी प्रज्ञाशीली सवाई, सुरेंद्र ठाकुर और वास्त उसारे तथा समिति के सदस्य अर्चना चापोलीकर, सुचेता भारंबे, अंकुश गायकवाड उपस्थित थे.

# लोकमत समाचार

| औरंगाबाद • सोमवार 27 अगस्त 2018 |




## गतिविधि







में किलेअर्क स्थित शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग की छात्राएं विभिन्न स्थानों पर कार्यरत लोगों को राखी बांधकर उन्हें अपनेपन का एहसास कराती हुईं.

PhotoCollage